# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक २१/०२/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### WCL आणि SBI मध्ये नौकरीचे आमिष दाखवून नागरीकांची आर्थिक फसवणुक

सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, पोलीस स्टेशन केळवद जि. नागपूर ग्रामीण येथे फिर्यादी नामे– सतिश प्रकाश आढे, वय ३० वर्ष, रा. खुरजगाव पो. मंगसा ता. सावनरे जि. नागपूर यांनी तक्रार दिली की, त्यांची पत्नी हीला (WCL) तसेच (SBI) बॅक मध्ये लिपीक पदावर नौकरी लावून देण्याचे आमिष देवून त्यांच्या कडून १०,००,०००/–रू. ची मागणी करून ५,८५,०००/–रू. घेवून त्यांना व्यवस्थापनाचे बनावटी खोटे नेमणूक पत्र तयार करून ते फिर्यादी ची फसवणूक करण्याचे उददेशाने फिर्यादीला खरे असल्याचे सांगून वेळोवेळी फिर्यादी व त्याच्या पत्नीला (WCL) कार्यालयात तसेच (SBI) व्यवस्थापनाचे कार्यालय दिल्ली व (SBI) शाखा सिडको औरंगाबाद येथे वारंवार बोलावुन त्यांना नौकरी न देता व त्यांच्या कडुन ५,८५,०००/–रू. घेवुन तिचा अपहार घेवुन फसवणुक केली.

अशा प्रकारे फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट घेवुन चौकशी अंती अप क्र. ०९/२२ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२०(ब) नुसार आरोपी क्र. १. शिल्पा राजीव पालपर्थी, २. अमित मारोती कोवे व ३. रमेश नथ्थुजी कामोने तिन्ही रा. नागपूर यांच्या विरूद्ध गुन्हा नोंद असुन तपास आर्थिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथे सुरू आहे. सदर गुन्हयाचे प्राथमिक तपासामध्ये यातील आरोपी व त्याचे इतर मुख्य सहकारी यांनी आणखी बरेच बेरोजगार नागरीकांची अशा प्रकारे फसवणुक केल्याची बाब निर्देषानात येत आहे.

तरी सर्वनागरीकांना या व्दारे आव्हान करण्यात येते की, त्यांची WCL/SBI मध्ये किंवा इतर प्रकारे नौकरी चे आमिष देवुन नमुद आरोपी व त्यांचे इतर मुख्य सहकारी यांनी पैसे घेवून फसवणुक केली असल्यास आपल्याकडे असलेल्या संपुर्ण पुरावे/माहिती/दस्तावेज घेवुन पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण कार्यालय सिव्हील लाईन्स नागपूर यांच्याशी संपर्क साधावा.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर